# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ०५/०२/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. पारशिवनी** :– दिनांक १०/१२/२०१८ चे २१.१९ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अप. क्र. ४१७/२०१८ कलम ३५४, ३५४ (अ), ३५४ (डी), २९४, ५०६, ३४ भादवी सहकलम ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १०/१२/२०१८ चे ११.३० वा. दरम्यान आरोपी क्र. १. धनपाल राजकुमार चौधरी, वय २५ वर्ष, रा. कान्हादेवी याने वय १७ वर्षीय पीडित/फिर्यादी हिचा पाठलाग करून ती कान्हादेवी रोडने जात असता तीला थांबवून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व आरोपी क्र. २. शुभम रमेश वासनिक, वय २४ वर्ष, रा. सकरला याने तिला शिवीगाळ केली. आरोपीला दिनांक १०/१२/२०१८ रोजी अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन महिला सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती मते, पो.स्टे. पारशिवनी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ०५/०२/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती मोटघरे, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपी क्र. १ ला कलम ३५४ भादंवि. मध्ये १ वर्ष साधी कैद व ५००/–रु. दंड व दंड न भरल्यास ७ दिवस साधी कैद तसेच कलम ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यामध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ५०००/–रु. दंड व दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. मोटघरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन महिला सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहायक फौजदार श्री. शंकरराव तराळे, श्री. किशोर निंबाळक, श्री. सुनिल डोंगरे, पोलिस हवालदार श्री. मनोज तिवारी यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**